लोकमत www.lokmat.com

# औरंगाबादेत हवामान बदलावर १४ पासून आंतराष्ट्रीय चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी :** येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या वतीने १४ ते १६ डिसेंबर या काळात औरंगाबाद येथे 'जागतिक हवामान बदल व कृषिक्षेत्रावर होणारे परिणाम' या विषयावर आंतराष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे.

राज्यातील चारही कृषी विद्यापीठ आणि औरंगाबाद येथील जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी)यांच्या वतीने या चर्चासत्राचे आयोजन केले आहे. औरंगाबाद येथील महात्मा गांधी मिशन येथील रुख्मिणी सभागृहात १४ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता पद्मभूषण डॉ.आर.एस.परोडा, निती आयोगाचे डॉ.रमेश चंद , चारही कृषी विद्यापीठांचे कुलगुरु, वाल्मिचे महासंचालक गोसावी, महिकोचे अध्यक्ष राजू बारवाले यांच्या प्रमुख उपस्थितीत चर्चासत्राच उद्घाटन होणार आहे. यात हवामान बदल, कृषी क्षेत्रावर होणारे परिणाम, जलक्षेत्रावर होणारे परिणाम, मत्स्य व पशू यांच्यावर होणार परिणाम आणि त्यावर करावयाची मात आर्दीबाबत चर्चा होणार आहे. विविध आठ सत्रांमध्ये शोध निबंधकाचे सादरीकरण होणार आहे. या चर्चासत्रात अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रोलिया, इजिप्त, श्रीलंका, व्हीएतनाम, बांगलादेश, नेपाळ आदी देशांतील ६०० हून अधिक शास्त्रज्ञ, संशोधक सहभागी होणार आहेत.

चर्चासत्राची एक वर्षापासून तयारी सुरु आहे. नवी दिल्ली येथील भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे माजी महासंचालक पद्मभूषण डॉ.आर.एस. परोडा हे सल्लागार समितीचे अध्यक्ष आहेत. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.बी.व्यंकटेस्वरलू हे आयोजन समितीचे अध्यक्ष आहेत.

08-12-2017 11:12